महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/गणवेष/न.क्र.१०/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

## प्रशासकीय परिपत्रक क्र. २२१ दिनांक २३ / ०३ / २००९

विषय : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील वाहनचालक व पहारेकरी यांना पुरविण्यात येणाऱ्या काळया चामडी बुटांच्या खरेदी खर्चाच्या प्रतीपूर्तीबाबत.

संदर्भ : प्रशासकीय परिपत्रक क्र.४१७ दिनांक २६.०३.२००४

......

संहिताबद्ध सामान्य आदेश क्र.१ दिनांक ३१.१०.१९७२ मधील तरतुदींनुसार महावितरण कंपनीमध्ये कार्यरत वाहनचालक व पहारेकरी यांना दरवर्षी एक जोडी बाटा कंपनीचे काळया रंगाचे चामडी बूट खरेदी करण्याकरिता रु.५४४/- पर्यंतच्या कमाल रकमेची प्रतिपूर्ती देण्यात येते. याबाबत, बाटा कंपनीचे सध्या उपलब्ध असलेले दर विचारात घेऊन वाहनचालक व पहारेकरी यांना काळया चामडी बुटांच्या खरेदीपोटी खर्च केलेल्या रकमेच्या प्रतिपूर्तीत वाढ करण्याबाबतचा व दरवर्षी सॉक्स (२ जोडी) पुरविण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. या संदर्भात सर्वकष विचार करुन व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन महावितरण कंपनीतील वाहनचालक व पहारेकरी या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना काळे चामडी बूट व २ जोडी पायमोजे (सॉक्स) यांच्या खरेदीसाठी खालील तक्त्यात दर्शविलेल्या दरांनुसार प्रतिपूर्ती देण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचा हुद्दा | साहित्य | प्रतिपूर्तीचे सुधारित दर (विक्रीकरासहित) |
|---|---|---|---|
| १. | वाहनचालक व पहारेकरी | काळे चामडी बूट | रु.७९९/- |
| २. | वाहनचालक व पहारेकरी | २ जोडी पायमोजे (सॉक्स) | रु.१००/- |

३. यानुसार महावितरण कंपनीमध्ये कार्यरत वाहनचालक व पहारेकरी हे काळे चामडी बूट व पायमोजे याकरिता उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या कमाल दराने अथवा प्रत्यक्ष खर्चाची रक्कम यातील किमान खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र राहतील.

४. काळे चामडी बूट व २ जोडी पायमोजे (सॉक्स) याकरिता प्रतिपूर्तीच्या सुधारित दराची अंमलबजावणी दिनांक ०१.०१.२००९ पासून करण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि. वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सु.य.पाटील

*( सु.य.पाटील )*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रत :
म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादितच्या विभागीय कार्यालय व त्यावरील सर्व स्तरापर्यंत.

*K/Adm.Cir.- Uniform*
*19/03/2009*